व्यसनांपासून दूर राहून विद्यार्थ्यांनी राष्ट्र उभारणीकडे वळावे -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई: व्यसनांपासून दूर राहून विद्यार्थ्यांनी शिक्षण, क्रीडा, कौशल्यविकास आणि राष्ट्र उभारणीकडे वळावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी मुंबई येथे केले. नवी मुंबई पोलिसांच्या 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानाअंतर्गत महाविद्यालयीन युवक-युवतींमध्ये अमली पदार्थांच्या सेवनाविरोधात जनजागृती करण्यासाठी 'कॅम्पस कनेक्ट' या विशेष मोहिमेचा शुभारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते.नेरूळ येथील डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटीज सेंटर ऑफ एक्सलन्स येथे आयोजित करण्यात आला.

RNI New Delhi-MAHMAR/2011/41080

साप्ताहिक भारतभर वितरीत होणारे

लेखा जगत

संपादक : शाम वसंत पाटील

Book - Post

Parvana(Subs.5000)/L-218/RNP-BH-91/2023-2025

To,

वितरीत न झाल्यास परत पाठवण्याचा पत्ता :-
साप्ताहिक लेखा जगत
वंजारवाडी मु. पो. सावदा ता. रावेर, जि. जळगांव (महा.) ४२५ ५०२

पान-१ ■ वर्ष : १९ ■ अंक : ४५ ■ रविवार , १७ ते २३ ऑगस्ट २०२६ ■ पाने : ४ ■ किंमत-१०/-रु.

एकनाथराव खडसे यांच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचा शुभारंभ

लेवाजगत न्यूज मुक्ताईनगर : महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री तथा ज्येष्ठ नेते आमदार एकनाथरावजी खडसे (नाथभाऊ) यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित अमृतमहोत्सवी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री संत मुक्ताई चरित्र कथा, भागवत कथा सप्ताह तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या पावन सोहळ्याचा शुभारंभ सतपंथ आचार्य प.पू. महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांच्या शुभहस्ते धर्मध्वजाचे ध्वजारोहण करून करण्यात आला. यावेळी श्री संत मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष ॲड. रवींद्र भैय्यासाहेब पाटील, ह.भ.प. रवींद्र हरणे महाराज तसेच परिसरातील संत-महंत, हरिभक्त परायण महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.

अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या धार्मिक सोहळ्यात संत मुक्ताई यांच्या चरित्राचे विवेचन, भागवत कथासप्ताह आणि विविध धार्मिक उपक्रमांमधून भक्तिमय वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमामुळे परिसरातील वारकरी, भाविक तसेच नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या प्रसंगी माजी महसूल मंत्री आमदार एकनाथराव खडसे, महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष तथा आमदार एकनाथराव खडसे अमृतमहोत्सव समितीचे अध्यक्ष अरुणभाई गुजराथी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रमोदभाऊ पाटील, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. जगदीशदादा पाटील, सौ. मंदाताई खडसे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष ॲड. रोहिणीताई खडसे, प्रा. डॉ. सुनील नेवे यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच परिसरातील भाविक भक्त, वारकरी बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक सोहळ्यात सहभागी झाले. संतपरंपरा, अध्यात्म आणि सामाजिक सलोखा यांचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमामुळे अमृतमहोत्सवी सोहळ्याला विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

कोलते-पाटील यांनी कंपनीच्या पुढील विकासाच्या टप्प्याला गती देण्यासाठी

श्री. हृषीकेश परांडेकर यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती

उरण: सुनिल ठाकूर

मुंबई, पुणे आणि बंगळुरू येथील बाजारपेठांमध्ये आघाडीवर असलेल्या रिअल इस्टेट कंपनी कोलते-पाटील डेव्हलपर्स लिमिटेड (BSE: 532924, NSE: KOLTEPATIL; KPDL) यांनी आज श्री. हृषीकेश परांडेकर यांची मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून नियुक्ती केल्याची घोषणा केली. ही नियुक्ती 24 ऑगस्ट 2026 पासून प्रभावी होईल.

ही नियुक्ती डुडळ्ळ्या विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. कंपनी विविध बाजारपेठांमध्ये विस्ताराला गती देत असून, व्यवसायाचा विस्तार, प्रभावी अंमलबजावणी आणि मूल्यनिर्मिती यावर अधिक भर देत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्री. हृषीकेश परांडेकर हे KPDLच्या पुढील विकासाच्या टप्प्याचे नेतृत्व करतील. त्यामध्ये व्यवसायाचा विस्तार, कार्यात्मक उत्कृष्टता, संस्थात्मक बळकटीकरण आणि भागधारकांसाठी दीर्घकालीन मूल्यनिर्मिती यांचा समावेश असेल.

IIM अहमदाबादचे सुवर्णपदक विजेते श्री. परांडेकर यांना रिअल इस्टेट, गुंतवणूक आणि धोरणात्मक नेतृत्व या क्षेत्रांमध्ये तीन दशकांहून अधिक काळाचा अनुभव आहे. व्यवसायाचा विस्तार, वाढीला चालना देणे आणि परिवर्तनाचे नेतृत्व करण्याचा त्यांचा भक्कम अनुभव आहे. KPDLमध्ये येण्यापूर्वी ते अल्फा अल्टरनेटिव्हज येथे वरिष्ठ भागीदार म्हणून कार्यरत होते, जिथे ते धोरणात्मक भागीदारी आणि रिअल इस्टेटमधील गुंतवणूक यांचे नेतृत्व करत होते. यापूर्वी त्यांनी मॅकिन्से अँड कंपनी, मॉर्गन स्टॅन्ले, कार्वी ग्रुप, ॲम्बिट होल्डिंग्ज आणि सुगी ग्रुप यांसारख्या संस्थांमध्ये नेतृत्वाच्या भूमिका बजावल्या आहेत. या संस्थांमध्ये त्यांनी धोरण, गुंतवणूक, विस्तार आणि कार्यात्मक उत्कृष्टता यांसारख्या

(पान ३ वर)

इस्कॉन नवी मुंबईत जन्माष्टमीचा भव्य सोहळा !

४ सप्टेंबरला श्रीकृष्ण जन्माष्टमी; महिनाभर विविध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

उरण: सुनिल ठाकूर

खारघर येथील इस्कॉन नवी मुंबई -श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी २०२६ निमित्त भव्य आध्यात्मिक आणि सांस्कृतिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

मंदिराचे अध्यक्ष डॉ. सुर दास यांच्या नेतृत्वाखाली २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान विविध धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यक्रम पार पडणार आहेत.

१५ जानेवारी २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंदिराचे उद्घाटन झाल्यानंतर अल्पावधीतच खारघरमधील हे मंदिर नवी मुंबईतील प्रमुख आध्यात्मिक आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले आहे.

२३ ऑगस्टपासून उत्सवाला सुरुवात

उत्सवाची सुरुवात २३ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट दरम्यान झुलन यात्रेने होणार आहे. दररोज सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत कीर्तन, भजन आणि विशेष आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यानंतर भाविकांसाठी प्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

२८ ऑगस्ट रोजी बलराम जयंती / बलराम पोर्णिमा साजरी करण्यात येणार आहे.

त्यानंतर २८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरद रम्यान श्रावण उत्सव होणार असून, दररोज

सायंकाळी ७.३० ते रात्री ९ या वेळेत नामवंत वक्त्यांकडून श्रीकृष्ण कथा आणि आध्यात्मिक प्रवचने आयोजित करण्यात आली आहेत.

४ सप्टेंबरला जन्माष्टमीचा मुख्य सोहळा - ४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा मुख्य उत्सव होणार आहे. मंदिर दिवसभर भाविकांसाठी खुले राहणार असून रात्रीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी ५ वाजता कलश दान्यांसाठी विशेष कलश अभिषेक सुरू होईल. रात्री ११ वाजता महाअभिषेक, त्यानंतर मध्यरात्री महाआरती, उत्साहपूर्ण कीर्तन आणि प्रसाद वितरण करण्यात येणार आहे.

दाते आणि आजीवन सदस्यांसाठी सदस्यत्व कार्डच्या आधारे विशेष दर्शनासाठी प्राधान्यक्रमाच्या स्वतंत्र रांगा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

५ सप्टेंबरला श्रील प्रभुपादांचा १३०वा प्रकटदिन

५ सप्टेंबर रोजी इस्कॉनचे संस्थापक-आचार्य श्रील ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचा १३०वा प्रकटदिन भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे. सकाळची विशेष स्तुती, कलश अभिषेक आणि महाप्रसाद वितरणाचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच ७ सप्टेंबर रोजी परमपूज्य गोपाळ कृष्ण गोस्वामी महाराज यांची व्यासपूजा, तर १९ सप्टेंबर

(पान ३ वर)

वीरवाजेकर महाविद्यालयात 'भविष्याची वाटचाल' मार्गदर्शन

उरण :सुनिल ठाकूर

रयत शिक्षण संस्थेच्या विहीर वाजेकर महाविद्यालय, फुंडे येथील विद्यार्थ्यांना वाणिज्य क्षेत्रातील विविध करिअरच्या

संधींची माहिती मिळावी तसेच त्यांच्या भविष्यातील करिअरची योग्य दिशा ठरवता यावी, या उद्देशाने CAFY & Super Mega Career Counselling Programme -हाभविष्याची वाटचाल' या विशेष करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया यांच्या करियर समुपदेशन उपक्रमाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमास सुमारे १५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना वाणिज्य, सी ए, सी एम ए, एम. बी. ए., वित्त आणि स्टॉक मार्केट यांसह विविध शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांमधील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. CA सुप्रिया सामंत यांनी विद्यार्थ्यांना शेअर मार्केट, वित्तीय क्षेत्र तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील करिअरच्या संधींबाबत कोर्स व त्याची तयारी प्रवेश परीक्षा याची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी करिअरविषयक विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते. त्यांनी विद्यार्थ्यांना करिअरची निवड करताना योग्य नियोजन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करण्याचे महत्त्व पटवून दिले. उपप्राचार्य डॉ. संदीप घोडके यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत कार्यक्रमाच्या आयोजनाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे नियोजन प्रा. भूषण ठाकूर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रांजल भोईर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. प्रियांका ठाकूर, प्रा. दिक्षिता म्हात्रे, प्रा. तन्वी कोळी, प्रा. रेणू सरोज आणि प्रा. ऋतुजा म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

विद्यार्थ्यांना केवळ पदवीपुरते मर्यादित न ठेवता CA, CMA, MBA, Finance, Stock Market तसेच इतर व्यावसायिक क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या विविध करिअरच्या संधींची जाणीव करून देणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सकारात्मक प्रतिसाद यामुळे 'भविष्याची वाटचाल' हा करिअर मार्गदर्शन कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुल आवरे येथे भारतरत्न राजीव गांधी यांची जयंती साजरी

प्रतिनिधी आवरे (शंकर पाटील)

भारताचे सहावे व तरुण असे थोर पंतप्रधान की ज्यांनी भारताला संगणक युगात

नेण्याचे स्वप्न पाहिले व ते सत्यात उतरविले भारतातील संगणक युगाचा पाया रचला असे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांची जयंती आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुल येथे साजरी करण्यात आली सर्वप्रथम या थोर विभूतिला विद्यालयातर्फे भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली राजीव गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त मध्ये विद्यार्थ्यांसाठी एक विशेष स्पर्धा आयोजित करण्यात आली होती ही स्पर्धा म्हणजे चित्रकला स्पर्धा या स्पर्धेमध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चांगल्या पद्धतीने सहभाग घेऊन या स्पर्धेला योग्य असा प्रतिसाद दिला अतिशय चांगल्या पद्धतीने नियोजन संबंधित शिक्षकानी केले होते आत्माराम ठाकूर मिशन संस्थेचे संस्थापक स्वर्गीय अशोक जनार्दन ठाकूर सर यांचे आदर्श म्हणजे स्वामी विवेकानंद महात्मा गांधी आचार्य विनोबा भावे व प्रेरणास्थान म्हणजेच राजीव गांधी होय राजीव गांधी यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत स्वतः अशोक ठाकूर सर यांनी सुद्धा आपल्या जीवनात राजीव गांधी यांची प्रेरणात्मक तत्वे अंगीकारली व ग्रामीण भागात इंग्रजी शिक्षणासाठी खूप प्रयत्न केले व ते सफल करून दाखविले ठाकूर सर हे राजीव गांधी यांच्या व्यक्तिमत्वाने कामालीचे प्रभावित होते अशा प्रकारे भारताचे थोर पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांची जयंती यांची जयंती जे जे ठाकूर विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सदर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली

कलासाधना सामाजिक संस्थेतर्फे 'राष्ट्रीय पुरस्कारासाठी' प्रस्ताव पाठवण्याचे आव्हान..

उरण : सुनिल ठाकूर

कलासाधना सामाजिक संस्था, नवी मुंबई यांच्या वतीने यंदाही राष्ट्रीय पुरस्कार -२०२६ चे आयोजन करण्यात आले असून, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या मान्यवरांकडून पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित करण्यात आले आहेत. हा पुरस्कार सोहळा ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिनाच्या निमित्ताने नवी मुंबई येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यात 'कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार -२०२६', 'राजा रवी वर्मा कलातपस्वी पुरस्कार' आणि 'भारत गौरवश्री पुरस्कार' अशा विविध पुरस्कारांनी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे.

शिक्षण, आदर्श शिक्षक, पत्रकारिता, साहित्य, कला, चित्रकला, शिल्पकला, ललित कला, क्रीडा, संगीत, गायन, वादन, सामाजिक कार्य, औद्योगिक क्षेत्र, वैद्यकीय सेवा, उद्योजकता, कृषी, सहकार, धार्मिक व आध्यात्मिक कार्य, महिला व बालविकास तसेच इतर विविध क्षेत्रांत समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करता येणार आहेत.

निवड झालेल्या पुरस्कारार्थींचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, मेडल व पुस्तक देऊन गौरव करण्यात येणार आहे. समाजासाठी निःस्वार्थपणे आणि सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी आपला संपूर्ण परिचय, कार्याचा सविस्तर तपशील, पासपोर्ट साईज फोटो तसेच उपलब्ध असल्यास पुरस्कार, सन्मानपत्रे व कार्याची छायाचित्रे प्रस्तावासोबत पाठवावीत. प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख ३० ऑगस्ट २०२६असून प्रस्ताव WhatsApp क्रमांक ७२०८१०१५८२वर पाठविण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

कलासाधना सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष सौ. मेघा महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली या राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे.

(पान ३ वर)

सावदा पोलिसांची धडक कारवाई; गोवंशाची बेकायदेशीर वाहतूक करणारे दोघे गजाआड

छोटा हत्ती वाहनासह ३ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त; दोन गोवंशांची सुटका

सावदा (जळगाव) : गोवंशाची कत्तल करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर व निर्दयपणे वाहतूक करणाऱ्या वाहनावर सावदा पोलिसांनी रविवारी रात्री धडक कारवाई केली. या कारवाईत दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, पिवळ्या रंगाच्या टाटा एस (छोटा हत्ती) वाहनासह एकूण ३ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहनातून दोन गोवंशांची सुटका करून त्यांना सुरक्षिततेसाठी गोशाळेत रवाना करण्यात आले.

सावदा पोलीस ठाण्यातील पोलीस हेडकॉन्स्टेबल मोहसीन रहेमानखा पठाण व पोहेकॉ निलेश बाविस्कर हे २२ ऑगस्ट रोजी

रात्री पोलीस ठाण्यात हजर असताना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सावदा शहरातील खवाजा नगरसमोरील मरीमाता मंदिराजवळून गोवंशाची कत्तल करण्याच्या उद्देशाने अवैध वाहतूक करणारे वाहन जाणार आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी रात्री सुमारे ८.५० वाजता मरीमाता मंदिराजवळ सापळा रचला. यावेळी ख्वाजा नगरकडून येणारे पिवळ्या रंगाचे टाटा एस वाहन क्रमांक टल 48 AG 5804 संशयास्पदरीत्या येताना दिसले. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी

पान ३ वर

दिपक श्रावगे यांची भाजपा सोशल मीडिया सावदा मंडळ संयोजकपदी निवड

सावदा (प्रतिनिधी) : भारतीय जनता पार्टी जळगाव जिल्हा (पूर्व) सोशल मीडिया जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, सावदा मंडळाच्या सोशल मीडिया संयोजकपदी दिपक रमेश श्रावगे यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष मा. आ. रवींद्रजी चव्हाण, जलसंपदा व आपत्ती निवारण मंत्री गिरीष महाजन, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे, विधानपरिषद आमदार नंदुभाऊ महाजन तसेच पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर यांच्या माध्यमातून जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

या निवडीबद्दल दिपक श्रावगे यांनी पक्षाचे वरिष्ठ नेते, जिल्हा व मंडल पदाधिकारी यांचे आभार मानले. पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासोबतच सोशल मीडिया माध्यमातून भाजपची ध्येयधोरणे, शासनाच्या विविध योजना तसेच विकासकामे जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

दिपक श्रावगे यांच्या निवडीबद्दल सावदा भाजपा मंडळ अध्यक्ष दुर्गेश पाटील तसेच भाजपा सोशल मीडिया जळगाव (पूर्व)चे तुषार चौधरी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या निवडीचे सावदा परिसरासह भाजपा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांकडून स्वागत होत असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.